# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६/ आषाढ १६, १९४८ (शके)

**११८.** महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ (३) अन्वये शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०२६ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांच्या सूचना :-

**(अ) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले तथापि, चर्चा न झालेल्या अशासकीय ठरावाच्या सूचना (क्रमांक १ ते ३) :-**

**(१) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ४१**

" राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रिडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रिडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. यांचा ठराव क्र. २९**

"पुणे शहरातील मुळा-मुठा नद्या आणि इतर जलस्रोत गंभीर प्रदूषित असणे, अपुरी सांडपाणी प्रक्रिया क्षमता, अनधिकृत बांधकामांमुळे नद्यांमध्ये सांडपाणी मिसळणे, पाणीपुरवठयाचे असमान वितरण (काही भागात ६०० लिटर तर काहीत १०० लिटर प्रति व्यक्ती), खडकवासला आणि इतर धरणांमधील प्रदूषण वाढणे, यामुळे पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता धोक्यात येणे आणि आरोग्य समस्या निर्माण होणे, नद्यांचे पुनरुज्जीवन आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांना (जसे JICA) गती देणे आवश्यक असणे, तरी शासनाने पुणे शहर आणि जिल्ह्यातील नदी प्रदूषण रोखण्यासाठी आणि पाणीपुरवठा समान व न्यायपूर्ण करण्यासाठी तातडीने कालबद्ध योजना राबवावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(३) श्री. अनिल मांगुळकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ८९**

" राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना स्थानिक भूमीपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(ब) मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी बॅलटमध्ये आलेल्या अशासकीय ठरावाच्या सूचना (क्रमांक १ ते ५) :-**

**(१) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ५७**

"राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधीअभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने ह्या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपावाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

.. २/-

(२) **<u>श्री. राजेश बकाने, वि.स.स. यांचा ठराव क्र. १४९</u>**

"राज्यात महिला व बाल विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करुन अध्ययन करित असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असणे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **<u>श्री. साजिद खान पठाण, वि.स.स. यांचा ठराव क्र. ७८</u>**

"राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर यासह बहुसंख्य शहरांची लोकसंख्या मोठयाप्रमाणात वाढत असणे, या शहरांच्या विविध भागात दरवर्षी वाढत असलेले कचऱ्याचे ढीग, कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची महानगरपालिकांकडील यंत्रणा अपूरी व कालबाहय झालेली असणे, शहरातील साठणाऱ्या या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात महानगरपालिकांना येत असलेले अपयश, कचऱ्यांच्या ढीगांमुळे अनेक भागात रोगराई पसरुन नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, दुर्गंधी पसरल्यामुळे रस्त्यावरुन नागरीकांना जाणे-येणे मुश्किल होणे, महानगरपालिकांनी यावर परिणामकारक उपाययोजना आखण्याची आवश्यकता असतानाही त्यांचेकडून तशी कार्यवाही न होणे, नागरीकांच्या आरोग्यांशी हा प्रश्न निगडीत असल्यामुळे शासन स्तरावरुन यात लक्ष घालण्याची आवश्यकता, कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी परिणामकारक व कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावेत, असे आदेश सर्व महानगरपालिकांना शासनाने द्यावेत, त्यानुसार परिणामकारक अंमलबजावणी होते किंवा कसे याचा आढावा घेण्यासाठी शासन स्तरावर उच्चस्तरीय यंत्रणा निर्माण करण्यात यावी, अशी शिफारस ही विधासभा शासनास करीत आहे."

(४) **<u>श्री. संजय देरकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. १५२</u>**

"विदर्भात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्ण अवेस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेवून विदर्भाची सिंचन विषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५) **<u>श्री. अनिल पाटील, वि.स.स. यांचा ठराव क्र. १८१</u>**

"राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गमवावे लागणे, राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत असणे, हे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता असणे, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गावर आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करण्याची आवश्यकता असणे, तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टॉफ, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता असणे, राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रॉमा सेंटर (Trauma Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे शक्य होणार असणे व यामधून दरवर्षी वाढत असलेली अपघातातील मृतांची संख्या देखील आटोक्यात आणण्यास निश्चितच मदत होणार असणे, तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रॉमा सेंटर (Trauma Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ७ जुलै, २०२६**

**मेघना तळेकर**
**सचिव- २,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**<u>याची प्रत :</u>**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (website)